महाराष्ट्र शासन
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी (महाराष्ट्र)
प्रशासकीय ईमारत, वसमत रोड, परभणी-431402
कुलसचिव कार्यालय

सत्यमेव जयते

कृषि मूलं हि जीवनम्

ईमेल : reg_mau@redifmail.com
संकेतस्थळ : www.vnmkv.ac.in

दुरध्वनी (02452) 229755
फॅक्स: (02452) 229755,223582

जा.क्र.वनामकृवि/साप्रवि/जाहिरात क्र.२/2962/२०२५

दि.२९.०७.२०२५

संदर्भ :१. शासन निर्णय क्रमांक : कृषिवि-३७२३/प्र.क्र.१६९/६-अे दि.१४. ऑक्टोबर २०२४
२. जा.क्र.वनामकृवि/साप्रवि/जाहिरात क्र.२/२२९७/२०२५ दि.०१.०७.२०२५
३. विद्यापीठ प्रकल्पग्रस्त पदभरतीबाबतचे इतीवृत्त दि.२५.०७.२०२५

## जाहीर सुचना (मुदतवाढ)

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी या प्रकल्पाकरिता (कृषि विद्यापीठातील) प्रत्यक्षात जमिन/घरे संपादित झालेल्या आहेत, अशा प्रकल्पग्रस्त कुटूंबातील उमेदवारांना सरळसेवेने रिक्त वर्ग-ड संवर्गातील पहारेकरी, मजुर तत्सम पदांची भरती करण्याकरिता संदर्भ क्र.२ नुसार दि.०१.०७.२०२५ रोजी विद्यापीठ प्रकल्पग्रस्तासाठी पदभरती करणेकरिता जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदरील जाहिराती अन्वये वर्ग-ड संवर्गातील पहारेकरी, मजुर तत्सम या पदाकरिता अर्ज करण्यासाठी दि.०१.०८.२०२५ पर्यत मुदत देण्यात आलेली आहे.

परंतु विविध प्रकल्पग्रस्त संघटना/अर्जदार यांनी या कार्यालयास निवेदन सादर करून मुदतवाढ देण्यावावत विनंती केलेली आहे. अनुषंगाने विद्यापीठ प्रकल्पग्रस्त संघटना/अर्जदार यांनी केलेल्या विनंतीनूसार या संदर्भात संदर्भ क्र.३ नुसार बैठक आयोजीत करण्यात आली होती. तद्नुषंगाने विद्यापीठ वर्ग-ड संवर्गातील पहारेकरी, मजुर तत्सम या पदाकरिता अर्ज सादर करणेसाठी विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमेदरांना **दि.०१.०८.२०२५ ऐवजी दि.२२.०८.२०२५** रोजी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

तसेच दिनांक २२.०८.२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केला जाईल. त्यानंतर प्राप्त झालेल्या कोणताही अर्जांचा विचार केला जाणार नाही. त्याचप्रमाणे, टपालाने विलंब झाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. असे प्राप्त झालेले अर्ज अपात्र ठरविण्यात येतील, याची संबंधित विद्यापीठ प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी नोंद घ्यावी.

(संतोष वेणीकर)
**कुलसचिव**